# पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सुविधा केंद्र

राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय, भारत सरकार

**वनस्पतीशास्त्र विभाग**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

कार्यालय : फॅकल्टी हाऊस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७, महाराष्ट्र

भ्रमणध्वनी : +९१-९०२१०८६१२५

ई–मेल : rcfc.wr.sppu@gmail.com

संकेतस्थळ : www.rcfcwestern.org


संदर्भ क्र. RCFC-WR/526 /२०२५

दिनांक : 8/12/2025

## सूचना

राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सह-सुविधा केंद्र, वनस्पतीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे कार्यान्वित आहे. या केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र, गोवा, गुजरात, राजस्थान हि राज्ये आणि दादरा नगर हवेली आणि दीव-दमण हे केंद्रशासित प्रदेश आहेत. या केंद्रामार्फत शेतकऱ्यांना औषधी वनस्पतींची रोपे लागवड करण्यासाठी उपलब्ध करून दिली जातात. जे शेतकरी महाराष्ट्र राज्यामध्ये औषधी वनस्पतींची लागवड करण्यासाठी इच्छुक आहेत, त्यांनी या केंद्राच्या ई-मेल rcfc.wr.sppu@gmail.com वर खालील अर्ज भरून, कागद पत्रासहित पाठवावा.

अधिक माहितीसाठी संपर्क क्र. +91-9021086125 वर 31 डिसेंबर, 2025 पर्यंत संपर्क करावा.

**केंद्रामध्ये उपलब्ध असलेली रोपे आणि रोपवाटिकेचे ठिकाण खाली दिले आहे;**

| रोपवाटिकेचे ठिकाण | उपलब्ध असलेली रोपे |
|---|---|
| **पत्ता-क्षेत्रीय सह सुविधा केंद्र पश्चिम -विभाग, (RCFC-WR) औषधी वनस्पती उद्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – 411007.** | बेल, कढीपत्ता, करंज मंडूकपर्णी, कांचन, अर्जुन, रिठा, बिब्बा, पुत्रंजिवा, इन्सुलिन, काटेकोरेटी, अडुळसा, आपटा, ब्राह्मी, आवळा, बहावा, सीता अशोक, बकुळ, कडुनिंब, कुडा, जांभूळ, निर्गुडी, कोकम, दंती, पिंपळी, अनंतमूळ, दमवेल, नरक्या, कांडवेल, आंबे हळद, रक्तरोहिडा, जास्वंद, चित्रक, पिवळा कोकम, जित्सया, सुरंगी, चंदन, हिरवा चाफा, गवती चहा, लक्ष्मीतरु, तुती, शिवण, गुंज, टेटू, शिरीष, शेंदरी, मेहंदी, शतावरी, पळस, जमालगोटा,गोरखचिंच, सर्पगंधा, इलायची, धोतरा, काळा अडूळसा, मुचकुंद, गुग्गुळ, कांडोळ, कुंभा, खाऊचे पान, पानओवा, माका, नागकेशर, लवंग तुळस, वाळा, समुद्रफळ, मोह, फणस. |
| **मु. पो- चांदूस, ता. - खेड, जि.- पुणे - 410505** | गवतीचहा, कांडवेल, सदाफुली, इलायची, शतावरी, गुंज, पानफुटी, पानओवा, अडूळसा. |

**'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्वावर रोपे वाटप करण्यात येईल. सदरील रोपे दि. 31 डिसेंबर, 2025 पर्यंत वाटप करण्यात येईल.**

**संपर्कासाठी नंबर:** +91-90210861625/ +91-9420907098

डॉ. दिगंबर मोकाट
प्रमुख संशोधक
पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सुविधा केंद्र,
राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय,
वनस्पतीशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे-४११००७, महाराष्ट्र